# प्रेसनोट

## खंडणी विरोधी पथकाकडून सराईत गुन्हेगारास ०१ गावठी पिस्तोल व ०१ जिवंत काडतुस सह अटक

दि. २०/०७/२०१८ रोजी खंडणी विरोधी पथकाचें अधिकारी व कर्मचारी मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे हद्दीत अँन्टी चेन स्नॅचिंग पेट्रोलिंग करीत असताना गंगाधाम चौक, मार्केटयार्ड येथे आले असता, खंडणी विरोधी पथकातील पोलीस नाईक शिवा बोले यांना त्यांचे विश्वासू बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार नामे स्वप्नील मिसाळ हा मार्केटयार्ड मधील, आंबेडकर वसाहतीकडे जाणाऱ्या रोडवर उभा असून, त्याने विक्रीसाठी एक गावठी पिस्तोल आणले असून ते जवळ बाळगून आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री. राहुल घुगे व स्टाफने सापळा रचुन स्वप्नील अंकुश मिसाळ, वय २१ वर्ष, व्यवसाय-काही नाही रा. पिंगळे वस्ती, गणेशबाग गणपती मंडळाजवळ, सांडभोरवस्ती मुंढवा, पुणे यांस पकडून त्याचे कब्जातुन ०१ गावठी पिस्तोल व ०१ जिवंत काडतूस असा एकूण किं.रु. १०,१००/- चे अग्निशस्त्र जप्त करण्यात आले आहे. सदरबाबत मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. ११८/१८ आर्म ॲक्ट कलम ३,२५ सह म.पो.का.क. ३७(१) १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे.

**वरील कारवाई ही श्री. प्रदिप देशपांडे सो, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे सो, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, पुणे श्री. समिर शेख सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे १ यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, पोलीस उप-निरीक्षक राहुल घुगे, पोलीस कर्मचारी संतोष मते, एकनाथ कंधारे, रमेश गरुड, उदय काळभोर, महेश कदम, मनोज शिंदे यांनी केलेली आहे.**